गुरुवार दि.१६ जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१२७ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# राम कृष्ण हरीच्या गजरात अवघी सावखेड तेजन नगरी दुमदुमली

## राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त ५७ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता







चित्रकार शुभाष पंडित यांनी काढलेले राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे छायाचित्र

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

तालुक्यातील सावखेड तेजन येथे ह. भ. प. श्री संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळा येथे आयोजित करण्यात आला होता मागील ५६ वर्षांची ही परंपरा गावकरी कायम ठेवत असून यावर्षी राष्ट्रसंत भगवान बाबा यांची ५७ वी पुण्यतिथी मोठ्या थाटामाटात संपन्न झाली.

दि. ०८ जाने रोजी या सप्ताहाची सुरुवात होऊन १५ जाने. रोजी या सप्ताहाची सांगता करण्यात आली. या वर्षाच्या सप्ताहामध्ये ह. भ. प. सोपान महाराज मुंढे यांच्या अमृतवाणीतून गावकरी व परिसरातील नागरिकांना भागवत कथा श्रावणाचा लाभ घेता आला. दि.८ जाने रोजी ह.भ.प. रमेश महाराज जायभाये यांचे कीर्तन पार पडले. त्यानंतर दि. ९ जाने रोजी ह. भ. प. ज्ञानेश्वरीकंठभूषण ह. भ. प. कृष्णा महाराज रासवे, १० जाने रोजी ह.भ.प. भगवान महाराज, ११ जाने रोजी ह.भ.प. शिवाजी महाराज बावस्कर, १२ जाने रोजी ह.भ.प. समाधान महाराज भोजेकर, १३ जाने रोजी ह.भ.प. संतोष महाराज वनवे, १४ जाने रोजी ह. भ. प. प्रकाश महाराज साठे, व १५ जाने रोजी ह. भ. प. गणेश महाराज बडे यांचे काल्याचे किर्तन पार पडले.मागील ५७ वर्षापासून ही परंपरा कायम असून मोठ्या उत्साहात श्री. संत भगवान बाबा यांची पुण्यतिथी सावखेड तेजन येथे एका सणाप्रमाणे साजरी केले जाते. संत येती घरा,तोची दिवाळी दसरा या उक्तीप्रमाणे सावखेड तेजन येथे सत्ताह पार पडतो यामध्ये गावातील तरुण प्रामुख्याने लक्ष घालतात आणि सप्ताह प्रारंभ झाल्यापासून सप्ताहाची सांगता व महाप्रसाद होईपर्यंत तरुण कटीबद्ध असल्याचे दरवर्षी दिसून येते.

## दरवर्षी शोभायात्रा काढून गाव प्रदर्शना



श्री संत भगवान बाबा पुण्यतिथीनिमित्त या सप्ताहाच्या आयोजन करण्यात येते. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी दिने या सप्ताहाची सांगता होते. यावर्षी भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी दिनी मकर संक्रात असल्यामुळे या सप्ताहाची सांगता एक दिवस उशिरा करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सप्ताह सांगताच्या दिवशी गावामध्ये शोभायात्रा काढण्यात आली. लहान मुलांपासून ते वयोवृद्ध नागरिकांपर्यंत गावकऱ्यांचा या शोभायात्रेत सहभाग असतो गावामध्ये विविध प्रकारे सजावट करून रांगोळी काढून राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या रथाने ही शोभायात्रा पार पडते. गावातील भजनी मंडळ व बाहेरून आलेल्या भजनी मंडळासह सर्व भजनी मंडळ यात्रेत सहभागी होऊन गाव प्रदर्शना करतात संत भगवान बाबांच्या मंदिरावर येऊन या यात्रेची समाप्ती होते.

# उमरी नगर पालिकेच्या वतीने पत्रकाराचा सन्मान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**



उमरी पत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जाभेकर आचार्य यांच्या जयंती निमित्त उमरी नगर पालिकेच्या वतीने पत्रकाराना सविधानाची पुस्तिका लेखनी व पुष्पगुछ देऊन शहर व तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांच सन्मान करण्यात आला. सर्वप्रथम आबेडकर चळवळीचे नेते जेष्ठ पत्रकार कालवश गगाधर सवई याना नगर पालिका व पत्रकार सघाच्या वतीने श्रद्धांजली देण्यात आली त्यानतर गगाधर पवार यांनी न पा कर्मचारी व पत्रकारांना सविधानाची शपथ दिली त्यांनतर मुख्याधिकारी श्रीमती निलम काबळे, कार्यालयीन आधिक्षक गणेश, मदने कु काचन पडलवाड याच्या उपस्थितीत पत्रकारांचा सन्मान करण्यात आला यावेळी बी व्ही चव्हाण , नरेंद्र येरावार शेख हुसैनी अब्दुल समद )प्रल्हाद हिवराळे )साहेराव तुरेराव पी जी गिलचे बापुराव रिठेकर )पाडुरग सोनकांबळ )लक्ष्मीकांत देशमुख नारायण यम्मेवार,)प्रशांत जोधळे,कैलास सोनकांबळे )फेरोज पटेल ईश्वर रननवरे )अनिल सोनकांबळे भारत सावळे शेख मुखीद डी जी तुपसाखरे उध्दव मामडे त्रिरत्न सवई आनदा राठोड, )पिराजी कराळे, राहुल सोनकांबळे )वसत सवई , )शिवराज मोकमपल्ले )शेख आरीफ, किशोर कवडीकर, आकाश सैदमवार,प्रकाश कार्लेकर,)फरहद बेग, होनशेट्टे )महेश पडोळे बाळतकड साई हमदे मारावार पोलशेटवार ताई मारोती शेळके : राजेश खाडरे राजेश सवई दिपक वारघडे, बगारीकर उमरी नगर परिषदेतील मुख्याधिकारी श्रीमती निलम कांबळे यांच्यासह लेखापाल. बालाजी चवरे, अभियंता– विनोद सावंत, कैलास येमेलवाड, विशाल बाराते, क.नि.अ. – कु.कांचन पडलवाड, कार्यालय अधीक्षक श्री.गणेश मदने, वरीष्ठ लिपिक,. सचिन गंगासागरे, चंद्रकांत श्रीकांबळे–मुकादम, सूर्यकांत माळवतकर लिपिक, गंगाधर पवार, शंकर माने, माधव जाधव,आकाश खंदारे,सुनंदा खंदारे, शहनाज बेग, मीरा सोनकांबळे सत्यनारायण पिडकुलवार, सचिन गगासागरे, शकील पठाण, सावगगाधर पवार, सुरेश माळवतकर,आदी उपस्थित होते यावेळी पी जी गिलचे,बीव्ही,अनिल सोनकांबळे,चव्हाण, नरेंद्र येरावार, लक्ष्मीकांत देशमुख, आदीनी यावेळी मार्गदर्शन केले.

# समर्थ कृषी महाविद्यालयातील रा. से.यो.शिबिराचा समारोप संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवतन**



डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला सलग्न समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा द्वारा आयोजित राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत विशेष हिवाळी निवासी शिबिराचा समारोप समारंभ हा ग्राम खाल्याळ येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी समारोप कर्ते डॉ. भगवान खरात, सुप्रसिद्ध साहित्यिक व्याख्याते देऊळगाव राजा यांनी अध्यक्ष पद भूषविले तसेच प्रमुख अतिथी डॉ. प्रफुल्ल ताठे, प्राचार्य समर्थ औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय देऊळगाव राजा, गजानन तिडके, लोकमत तालुका प्रतिनिधी अध्यक्ष देऊळगाव राजा , समर्थ कृषी महाविद्यालय प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे , प्रभाकर दंदाले, सरपंच खल्लाळ गव्हाण , बद्री दंदाले, माजी सरपंच खल्लाळ गव्हाण, श्रीकृष्ण बाजीराव दंदाले, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष व गावकरी मंडळी हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून झाली. कार्यक्रमाची शोभा स्वागत गीताने वाढवली. रा.से.यो.च्या स्वयंसेवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना व सेवा संस्कार व्हावा व तरुणांकडून राष्ट्रीय सेवा घडवी, युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा या हेतूने रा.से.यो. हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले . त्यानंतर रा.से. यो.च्या स्वयंसेवकांनी शिबिरातील आपला अभिप्राय व्यक्त केला. त्यामध्ये वैष्णवी गोळे, रुतुजा वाघ, आदित्य ठाकरे, अर्जुन जाधव, अक्षय जाधव, श्वेता पवार व दुर्गा मापरी या स्वयंसेवकांनी शिबिरातील त्यांचा अनुभव सर्वांना सांगितला. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. भगवान खरात यांनी शेतीच्या उज्वल भविष्यासाठी काय उपाययोजना करता येतील यावर मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे यांनी सर्व रासेयो च्या स्वयंसेवकांना यशस्वी शिबिराच्या शुभेच्छा देत त्यांचे अभिनंदन केले. समारोप समारंभ यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा किरण ठाकरे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा अश्विनी जाधव, प्रा विलास सातपुते, प्रा विकास म्हस्के, प्रा सोनाली इंगळे यांनी परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा ही ज्ञानेश्वर वाघ यांने सांभाळली व आभार प्रदर्शन ऋतुजा बनकर यांनी केले.

## श्री क्षेत्र बारलिंगी देवस्थानात होणाऱ्या भाजी भाकरी पंगतीसाठी

# भोकर परीसरातील भक्ताकडून ११ क्विंटलच्या भाकऱ्यांचं महादान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**





भोकर पासून केवळ १५ किमी अंतरावर असलेल्या हदगाव तालुक्यातील यादवकालीन मंदिर असलेल्या श्री क्षेत्र बारलिंग देवस्थानात गेल्या १६० वर्षापासून भाजी भाकरीचा महाप्रसाद दिल्या जातो मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी या भाजी भाकरी पंगतीचे आयोजन होते या पंगतीत सर्व जातीतील धर्मातील आबाल वृद्ध या भाजी भाकरीचा भक्ती भावाने लाभ घेतात या भाजी भाकरीच्या पंक्तीसाठी तेलंगाना कर्नाटक पुणे व मराठवाड्यातील अनेक गावागावातून भक्त येतात .भाजी भाकर पंगत सुरू होण्यापूर्वी सकाळी नऊ वाजता बारा ज्योतिर्लिंग चा अभिषेक केला जातो व दुपारी बारा वाजता नैवेद्य दाखवून पंगतीस प्रारंभ होतो.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी पण भोकर शहर व परिसरातून भाकरी गोळा करण्याचे आव्हान दत्तगड चे महाराज श्री उत्तम बन महाराज यांनी केले होते त्यांच्या आवानास भोकरच्या भक्तगणांनी प्रतिसाद देत श्रीक्षेत्र बारालिंगी देवस्थान येथे होणाऱ्या भाजी भाकरी पंक्तीसाठी ११ क्विंटल च्या भाकरी जमा करून त्या वाजत गाजत मिरवणूक काढून देवस्थानाकडे पाठविण्यात आल्या . भाजी भाकरी गोळा करण्याकरिता साईदास माळवंतकर, नारायण सादुलवार, दिनेश लक्षटवार, मंठाळकर, प्राध्यापक व्यंकट माने, बाळू सारडा, माळवंतकर, यशवंतकर,संजय सोनाळे, आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# कुंडलवाडी येथे पद्मशाली समाजाच्या महिला कडून सक्रांत सण साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**



येथील पद्मशाली समाजातील महिला कडून १४ जानेवारी रोजी शहरातील नामदेव महाराज मंदिरात मोठ्या उत्साहात सक्रांतीचा सण साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित महिलांनी कुंकुमार्चन विधी करत एकमेकीना संक्रांतीचे वाण दिले .

पहिल्यादांच मोठ्या प्रमाणात शहरातील पद्मशाली समाजाच्या महिला एकत्र येऊन आतिशय आनंदात व उत्साहात सण साजरा केल्यामुळे या महिलांचे कौतुक होत आहे. यावेळी माजी नगराध्यक्षा सौ. सुरेखा जिट्टावार, डॉ अश्विनी सब्बनवार, सौ संतोषी बाभळीकर सौ भाग्यश्री बाभळीकर, सौ. कौशल्या शक्करकोट, सौ. गोदावरी पडकुटलावार, सौ. दैवशीला बाभळीकर, सौ. श्रद्धा गुरपवार, सौ अनुराधा सब्बनवार, सौ संगीता मेरगेवार, सौ कमल जिट्टावार, सौ. शोभाबाई मामीडवार, सौ गंगामणी बाभळीकर, सौ. अन्नपूर्णा जिट्टावार, सौ. सोनी सब्बनवार, सौ. रचना कनकमवार, सौ. लतीका जडलवार, सौ. अनुसया गंगुलवार, सौ. सविता पोतुलवार, सौ. स्वरूपा गुरूडवार, सौ. जयश्री नामावार, सौ. लक्ष्मी श्रीगादेवार, सौ. गंगामणी दिड्डेवार आदीसह अनेक महिला उपस्थित होत्या.

# निपुण जल्लोष २०२५ कार्यक्रमांतर्गत विविध मैदानी व सांस्कृतिक खेळाचे होणार आयोजन

## शिक्षण विस्तार अधिकारी काळात पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

मन व मनगट मजबूत करण्यासाठी शालेय जीवनापासुन खेळ आणि व्यायामाची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने निपुण जल्लोष २०२५ या कार्यक्रमांतर्गत पालकांसह विद्यार्थ्यांच्या विविध खेळांचे व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्या निमित्ताने बुधवार दि.१५ रोजी शिक्षण विस्तार अधिकारी काळम पाटील यांच्या उपस्थितीत गुळज, धोंडराई व वसाहत बागपिंपळगाव या बीट मधिल शाळांची गेवराई पंचायत समिती सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली होती.

तर्कसंगत विचार व कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश आहे. सध्याच्या काळात लहान वयातही विद्यार्थ्यांना ताण तणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर शालेय जीवनात आनंददायी कृती करण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. या अनुषंगाने आनंददायी शनिवार हा उपक्रम राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीसाठी संदर्भ क्रमांक दोन नुसार राबविला जात आहे.राज्यात सन २०२६ – २७ पर्यंत इयत्ता तिसरी पर्यंतच्या शंभर टक्के विद्यार्थ्यांना मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता प्राप्त करण्यासाठी तसेच इयत्ता तिसरीच्या पुढे गेलेल्या तथापि अपेक्षित क्षमता प्राप्त न करू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्ये, मौखिक भाषा विकास, उच्चार शास्त्राची जाणीव, सांकेतिक भाषा समजून घेणे, शब्दसंग्रह वाचन व अकलन, वाचनातील ओघवतेपणा,



लेखन, आकलन, वाचन संस्कृती व वाचनाकडे कल तसेच पायाभूत संख्या साक्षरता, संख्याज्ञान व गणितीय कौशल्ये यासंबंधीच्या क्षमता अवगत होणे अपेक्षित आहे. यासाठी विविध शैक्षणिक साहित्य मनोरंजक खेळ आनंददायी उपक्रम सृजनशील प्रयोग यांची अंमलबजावणी शिक्षक करत आहेत.यास अनुसरून शालेय जिवनात शिक्षण घेता घेता विद्यार्थी मधील खेळाडू वृत्ती मरु नये यासाठी निपूण जल्लोष या कार्यक्रमांतर्गत शिक्षण विभाग पंचायत समिती गेवराई येथील जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी काळम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील खेळ व विविध स्पर्धा या २१ जानेवारी पासून सुरू होत असून या स्पर्धेच्या अनुषंगाने बुधवार दि.१५ रोजी पंचायत समिती गेवराई या ठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत निपुण जल्लोष या कार्यक्रमांतर्गत समितीची स्थापना करण्यात आली यामध्ये आरोग्य समिती, पाणी पुरवठा समिती, पारितोषिक समिती, प्रसिद्धी समिती, नियोजन समिती, स्पर्धात्मक भुमिका, वैयक्तिक स्पर्धा, मैदान समिती, व्यासपीठ समिती, सांस्कृतिक समिती अशा विविध समित्यांचे गठण करुन त्यांना कामे सोपविण्यात आली आहे. यावेळी सर्व उपस्थित शिक्षकांना बोलताना काळम पाटील म्हणाले की, २०२७ मध्ये जेव्हा या निपुण जल्लोष कार्यक्रमाची सांगता होईल तेव्हा आपल्या बीटचे नाव व्हावे. यासाठी सर्वांनी आनंदाने या स्पर्धेत्मक कार्यक्रमात सहभागी व्हावे असे ही यावेळी सांगितले. यावेळी केंद्रप्रमुख भगवान मोरे, केंद्रप्रमुख नामदेव शिंदे, केंद्रप्रमुख विशाल कुलकर्णी आदींसह बीट मधील शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयवान कुटे यांनी केले.

# आईच्या डायरीतून

लोकनेता न्यूज नेटवर्क

एक दिवस मला माझ्या आईची खूप आठवण येत होती. फोन करू करू म्हणून करायचा राहून गेला होता. आता रात्रीचे अकरा वाजले होते आई एव्हाना झोपली सुद्धा असेल म्हणून आता तिला फोन करण्यात काही अर्थ नव्हता याशिवाय इतक्या रात्री फोन आला तर तिला काळजी वाटली असती. म्हणून मी फोन करायचं टाळले. आता माझंच माझ्यासोबत बोलण सुरू झाल. आईच्या आणि माझ्या कितीतरी गोष्टी मला सतत आठवायला लागल्या. लहान असताना आई चिऊ काऊच्या गोष्टी सांगून घास भरवायची. छूकु छूकु आगीन गाडी गाऊन आम्हाला थेट मामाच्या गावी नेऊन पोहचवायची. मग अचानक मला माझ्या अर्थवट वयातली मी आईसोबत कसं वागले हे ही आठवायला लागलं. आई सोबतची भांडणे, माझी आदळआपट, रुसून बसन, अबोला आता मला प्रचंड अपराधी वाटायला लागले. आपण किती चुकलो आईला किती त्रास दिला. खरं तर आईची भूमिका मी आई झाल्यावर समजू लागले. आता मी माझ्या लहानग्याला निरखु लागले. तो शांत झोपला होता. त्याचा निरागस चेहरा बघून माझं मातृ हृदय अधिकच उचंबळून आलं. माझा मुलगा आता मोठा होत आहे तो ही असाच वागेल का? की समजून घेईन मला. मुलं मोठी होत असताना त्यांना त्यांचे जग असत. आई-वडिलांच्या पंखांची सावली काही वेळा त्यांना नकोशी होते. हे मी स्वतः अनुभवलेलं होतं. आता एक आई झाल्यानंतर मला आई ची भुमिका नव्याने उमगायला लागली होती. आता आईच आणि माझ नाते नव्याने फुलत होत फरक एवढा आहे की आता आई कधी कधी लहान मुलासारखं वागते मग मलाच तिची आई होऊन तिला समजून घ्यावं लागत. माझा असाच स्वतः सोबत सावांद चालू होता. माझ्या मुलाने त्याचे रेशमी इवलेसे हात माझ्या गळ्याभोवती टाकून झोपतेच

' आई माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे ' असे म्हंटले. खरं तर मी अनेक दिवसापासून माझ्या मुलाला मराठी शिकवत होते. नवरा हिंदी भाषिक तसेच सगळे शेजारी ही अमराठी या मुळे तो हिंदीच बोलत होता. पण आज तो त्याचे आईविषयी असणारे प्रेम तिच्याच मातृभाषेत व्यक्त करत होता.

काळ कितीही बदलला तरी आई मुलांचे प्रेम तसेच कायम आहे निरागस आणि निरपेक्ष!



अंजली पगारे
(राज्यकर निरीक्षक)
छत्रपती संभाजीनगर

# रस्ता सुरक्षा संदर्भात जनजागृती करा जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करणे हे रस्ता सुरक्षतेच्या दृष्टीने अंत्यत महत्वाचे असून रस्ते अपघातात जखमी व मृत्यू होण्याचे प्रमाण दुचाकी वाहनाचे सर्वाधिक आहे. प्रामुख्याने हेल्मेट घातलेले नसल्यामुळे मृत्यूचे प्रमाण अधिक असल्याने रस्ता सुरक्षा संदर्भात व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यावेळी केले.

रस्ता सुरक्षा समिती, व पोलीस विभाग व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे हेल्मेट जनजागृती अभियानानिमित्त शहरातून हेल्मेट रॅली काढण्यात आली. या हेल्मेट रॅलीला जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केली. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी नागनाथ महाजन, सहायक पोलीस निरिक्षक आशिष रोही उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सेल्फी पाईटवर फोटो काढून हेल्मेट घालूनच प्रवास करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. हेल्मेट रॅलीची सुरुवात जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरु होऊन जयस्तंभ चौक, धाड नाका, सर्कुलर रोड, भोडे चौक, बाजार लाईन मार्गे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे रॅलीचा समारोप झाला. या रॅलीमध्ये पोलिस विभाग, नगरपरिषद व परिवहन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, वाहन वितरक प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी नागरिक व कर्मचाऱ्यांना रस्ता सुरक्षासंदर्भात प्रबोधन केले.




# देवानंद गुंडेकर यांची दैनिक अर्थ या दैनिकाच्या उपसंपादक पदी तसेच राज्य मराठी पत्रकार परिषद जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । प्रभु कदम**

हिमायतनगर तालुक्यातील ग्रामीण भागातील असलेले देवानंद गुंडेकर यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला पाहता त्यांची राज्य मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी तसेच दैनिक अर्थ या दैनिकाच्या उपसंपादक पदी निवड करण्यात आली आहे.आजच्या पत्रकारीता क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात डिजिटल मीडिया तसेच दैनिक वर्तमानपत्राद्वारे अनेक पत्रकार कार्य करत आहेत. पत्रकार क्षेत्रातील नव्याने नावलौकिक मिळवलेले



हिमायतनगर तालुक्यातील पत्रकार देवानंद गुंडेकर यांनी आपल्या् प्रखर निर्भीड, लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. तसेच अगदी सामाजिक शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटविला आहे. स्वतः एक शिक्षक असताना विद्यार्थ्यांना भविष्याचे धडे देत देत पत्रकारितेच्या माध्यमातून समाजकार्य करत आहेत. त्यामुळे अल्पवधीतच देवानंद गुंडेकर यांनी नावलौकिक मिळवल्याने. त्यांच्या या कार्याला पाहता राज्य मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी तसेच दैनिक अर्थ या दैनिकाच्या उपसंपादक पदी निवड करण्यात आली आहे.यावेळी राज्य पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मधुसूदन कुलथे, प्रमोद जैन, राजकुमार बिर्ला, संदीप महाजन, बालाजी पेनुरकर, अनिल शिरसाट, ॲड.अनुप आगाशे, सिद्धोधन हनवते, प्रशांत राहुलवाड,विजय भालेराव, मनोज तपासकर, गणेश खडसे, अनिल नाईक, यावेळी उपस्थित होते.त्यांच्या या निवडीमुळे हिमायतनगर तालुक्यातील सर्व पत्रकार संघटनेद्वारे तसेच सर्व स्तरावरून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.




बाबरीनगर दाभड ता अर्धापूर येथे ३८ व्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद राज्याचे माजी मुख्यमंत्री विद्यमान खासदार आदरणीय अशोकरावजी चव्हाण साहेब, माजी आमदार अमरभाऊ राजुरकर, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर,महाउपासक डॉ एस पी गायकवाड सह भिक्कुगण उपस्थित(छाया -संदिप कदम)

# आरोग्याची शिकवण वाणातून देऊ ; एकात्मतेचा संदेश घेऊन जाऊ!

## कंधार तालुक्यातील बारूळ येथील महिला ग्राम संघाच्या वतीने दिला संदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

वर्षातील पहिल्या सणांची सुरूवात ही सुवासिनी स्त्रियाचा सण म्हणजे मकरसंक्रांत महिलांचा उत्साहाचा आणि आनंददायी सण यानिमित्त महिला एकमेकींना वाण म्हणून अनेक गृह उपयोगी वस्तूंची भेट देतात यंदा महागाईने कळस गाठला असला तरी वाण खरेदीला महिलांनी गर्दी केली होती एकमेकींना हाळदी कुंकवाच्या नैसर्गिक बोरिबेट हा ऊस या संयुक्त पारंपारिक चा वाण भेट देऊन उत्तम आरोग्य आणि एकात्मतेचा संदेश महिलांनी देत यावेळी मकरसंक्रात साजरी केली

मकरसंक्रांत म्हणजे प्रत्येक महिलेच्या आपुलकीचा प्रेमाचा हा आनंददायी सण असतो प्रत्येक महिला प्रत्येकाच्या घरी जाऊन वाण देवाणघेवाण करत असतात परंतु बारूळ येथील आंरभ महिला ग्राम संघाच्या वतीने व या संघातील सर्व महिलांच्या संयुक्तपणे शेकडो महिला एकत्रित येऊन गावातील विठ्ठल रुक्मिणी हनुमान मंदिर येथे मकरसंक्रांतीचा कार्यक्रम ठेवण्यात आला यामध्ये ३० महिलांच्या पुढाकारातून सहभाग नोंदवून गावातील सर्व घरातील महिलांना वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात वान लुटण्याचा आव्हान केले व यामध्ये सर्व जाती धर्माच्या जवळपास १७०० महिलांनी सहभागी होऊन गावातील एकात्मतेचा संदेश दिला यामध्ये महिलांना वाण देऊन यावेळेस गावातील सार्वजनिक उपक्रमामध्ये सहभागी होण्याचा निश्चय निर्णय केला यावेळेस उखाणे स्पर्धा घेण्यात आली आरंभ महिला ग्रामसंघाच्या वतीने गावातील सर्व जाती धर्माच्या महिलांना एकाच ठिकाणी एका छताखाली आणून शेकडो महिलांना एकत्रित करण्याचा व पारंपारिक पद्धतीने बोर जांब गाजर ऊस फुल बिबे ढाळ एकत्रित केलेला ओलावान एकमेकांनी निसर्ग पूरक वस्तू वापरल्या हळदी कुंकवाच्या वाणाचा कार्यक्रम घेऊन तसेच महिलांनी पारंपारिक खेळ उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या होत्या यावेळी हा मकर संक्रांतीचा कार्यक्रम प्रेमाने एकमेकांना सालोख्याने सण उत्साहात पार पडला यावेळेस त्या ३० महिलांचे कौतुक परिसरात होत आहे.



# अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे राष्ट्रीय सेवा योजना व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिट्रसी अंतर्गत लोकसंख्या नियंत्रण जनजागृती या अभिनव उपक्रमांतर्गत विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर दिनांक: ०७ जानेवारी ते १३ जानेवारी, २०२५ या कालावधीत तळेरान या ठिकाणी यशस्वीरित्या पार पडले असल्याची माहिती राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. निलेश काळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे यांनी दिली. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष श्री. राजेंद्र घाडगे मानद सचिव श्री. ड.संदीपजी कदम आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . महेंद्र अवघडे यांच्या मार्गदर्शनानुसार आणि राष्ट्रीय सेवा कार्यक्रमाधिकारी डॉ निलेश काळे यांच्या नियंत्रणाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर यशस्वीरित्या पार पडले. सदर शिबिरात स्वयंसेवक आणि समाज, किशोवयीन मुलामुलींच्या समस्या, लोकशाहीतील सहभाग आणि मतदार, जैवविविधता व अधिवास संवर्धन, शाश्वत ग्रामीण विकास, रक्तक्षय आरोग्य शिबीर, बालविवाह रोखण्यासाठी समाज प्रबोधन, श्रद्धा, अंधश्रद्धा व वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकसंख्या नियंत्रण व जनजागृती आणि नदी स्वच्छ्ता व वृक्षारोपन काळाची गरज इत्यादी विषयांवर सात दिवस व्याख्यानाचे व सामाजिक प्रबोधनपर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या समारोप प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. निलेश काळे आणि आपल्या प्रास्तविकपर भाषणात महाविद्यालय, विद्यार्थी आणि गावातील लोक यांच्या सहकर्यामुळेच विशेष श्रमसंस्कार शिबीर यशस्वी झाले. या श्रमसंस्कार शिबिरामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण भागाशी आपली नाळ घट्ट करता येईल. त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबवण्यात आलेल्या



उपक्रमांची माहिती त्यांनी आपल्या मनोगताद्वारे दिली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि तळेरान गावचे लोकनियुक्त सरपंच श्री.गोविंद साबळे यांनी आपल्या मनोगतात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी राबवलेल्या विविध उपक्रमांचे स्वागत केले आणि समाधान व्यक्त केले. त्याचबरोबर पुढील शैक्षणिक वर्षातही आमच्याच गावामध्ये शिबिराच्या आयोजन करून अशाच विधायक आणि नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजन करावे असे आव्हान केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी आपल्या मनोगतात आजचा विद्यार्थी हा आपल्या देशाचे उद्याचे भविष्य आहे. देशाचे भविष्य जर राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक या सारख्या सामाजिक जाणीव असलेल्या विद्यार्थ्याकडे असेल तर आपला देश नक्कीच महासत्ता म्हणून नावरुपास येईल. सामाजिक जाणीव असलेला विद्यार्थी हिच खरी राष्ट्रांची संपत्ती आहे. या सात दिवसाच्या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना ज्या काही चांगल्या सवयी लागलेल्या आहेत त्याचे जर अनुकरण विद्यार्थ्यांनी आयुष्यभर केले तर एक शिस्तबद्ध आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व म्हणून माझ्या महाविद्यालयाचे विद्यार्थी नावरूपास येतील. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के.डी.सोनावणे, उपप्राचार्य डॉ. रमेश शिरसाट, मराठी विभाग प्रमुख डॉ.वसंत गावडे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनीलजी लंगडे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदिपान गव्हाळे, हिंदी विभाग प्रमुख डॉ. राजेश रसाळ, ग्रंथपाल डॉ. निलेश हांडे, डॉ. रमाकांत कसपटे, विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक आणि राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. नंदकिशोरजी उगले, डॉ आशुतोष ठाकरे, डॉ. विनायक कुंडलिक आदी प्राध्यापक, तळेरान गावचे ग्रामस्थ उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. निलेश काळे, डॉ.राजेंद्र आंबवणे, प्रा. सुवर्णा डुंबरे,डॉ.अविनाश रोकडे आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.

# संजय गांधी विद्यालय कलंबर येथे उस्माननगर पोलिस ठाण्याच्या वतीने पोलिस दीदी उपक्रम राबविला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

संजय गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कलंबर येथे गाडेकर साहेब यांनी शाळेला भेट देऊन पोलिस दीदी बद्दल माहिती दिली.किशोर वयातील (१२ ते १८) वयोगटातील इयत्ता आठवी ते बारावी पर्यंतच्या मुलामुलींना गजानन गाडेकर पोलीस उपनिरीक्षक पोलिस ठाणे उस्माननगर यांनी अधिनियम कायदा, विद्यार्थ्यांची सुरक्षा, गुन्हेगारी प्रवृत्ती, मुला मुलीने सावधगिरीने वागले पाहिजे यासह युवती आणि महिलांना टारगटांचा होणारा त्रास रोखण्यासाठी उस्माननगर पोलिस स्टेशन मुली व महिलांचे छेडछाडीचे प्रकार घडल्याची





माहिती समजल्यानंतर हे पथकच उपरोक्त ठिकाणी धडक मारून टवाळखोरांचा समाचार घेणार आहे.

या शिवाय, प्रत्येक युवतीने स्वरक्षणासाठी स्वयंपूर्ण व्हावे, याकरिता शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थिनींना महिला पोलिस मदत करतील.तसेचअन्यायग्रस्त मुली व महिलांनी निसंकोचपणे आपले म्हणणे महीला पोलिस यांच्या कडे मांडू शकतात.किंवा आपली आई, बहीण, वर्गशिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांना आपल्याला कोणी त्रास देत असेल तर सांगावे असे त्यांनी विद्यार्थ्यीनीना संबोधित केले तसेच आपण अनेराये मॅडम यांच्याशी संपर्क साधावा असे ही त्यांनी आवर्जून सांगितले.यावेळी समाज उन्नती शिक्षण संस्था कलंबर चे अध्यक्ष मारोतीराव पाटील घोरबांड साहेब यांनी पोलिस उपनिरीक्षक गाडेकर साहेब यांचा शाल श्रीफळ पुष्पहार घालून सत्कार केला .याप्रसंगी उस्माननगर पोलिस स्टेशन चे पोलिस कर्मचारी,कलंबर चे पोलिस पाटील महेश करडे,शाळेतील महीला अध्यापिका,अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पेठवडज येथील महाविद्यालयाला उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी जगताप यांची भेट




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

पेठवडज येथील संत नामदेव महाराज कनिष्ठ महाविद्यालय व शंकरराव चव्हाण महाविद्यालय पेठवडज ता.कंधार येथे मुलांना मार्गदर्शन करताना उपविभागीय पोलीस अधिकारी मा.अश्विनी जगताप मॅडम यांनी कायद्याची माहिती दिली यावेळी कंधार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.जाधव साहेब. संस्थेचे अध्यक्ष देविदास पाटील. प्राचार्य गोणारकर सर.मा.माने सर प्रा. किनवाड सर प्रा. हिपरगेकर सर प्रा. तुंबरफळे सर प्रा परतवाड सर प्रा.हाके सर प्रा रामकिशन वडजे सर प्रा. होनवडजे सर अशोक वडजे नामदेव काचेबोईनवाड मुख्याध्यापक. मा.पांचाळ सर प्रा. आटकळे सर मुख्याध्यापक व पेठवडज बिट चे जमादार गिते साहेब व प्राध्यापक उपस्थित होते.

# शरद पवार उर्दू हाईस्कूल जुनियर कॉलेज चांडोळ विध्यार्थीने उभारला व्यापार मेळावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चांडोळ । प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यातील चांडोळ येथे शरद पवार उर्दू हाईस्कूल जुनिअर कॉलेज येथे बुधवारी बाळ आनंद मेळावा आयोजित करण्यात आले होते. यावेळी विध्यार्थीनी या मेळाव्यात स्टॉल लाऊन स्व. परिषमाने बनविलेल्या विविध साहित्याची विक्री करून भरपूर पैशाची कमाई केली आहे. तसेच या मेळाव्यात आपापल्या स्टॉल ची सजावट करत व बोर्ड लाऊन येणाऱ्या गावाकऱ्यांचे व येणाऱ्या प्रमुख पाहुण्यांचे लक्ष वेदले आहे.या वेळी विध्यार्थीने पाणी पुरी, मुंग वडा, पान शाप, चिकन बिर्याणी, लस्सी, बदाम शेक,व विविध खान पान चे दुकान लावले होते.



या मेळाव्यात गावचे प्रथम नागरिक सरपंच सुनील महेर, शिवाजी देशमुख, कलीम अत्तार, इब्राहिम भाई, नसरूला पठाण, यांनी चार चांद लावले. त्यानंतर धाड पोलीस स्टेशन चे ीठि श्री. चेचरे आहेब, केंद्र साहेब,पोलीस पाटील पंकज देशमुख यांनी ही उपस्तीथी दर्शवली. या मेळाव्याचा चांडोळ येथील माँ जिजाऊ, जिल्हा परिषद उर्दू स्कूल, मौलाना आजाद धाड येथील विध्यार्थीनीही हजेरी लावली यावेळी मौलाना आजाद एज्युकेशन संस्थाचे सेकेटरी हाजी इकबाल सदागर साहब यांनी ही हजेरी लावली.या मेळाव्याला गावातील तरुण मंडळी व पालकानी ही भरपूर सात दिली. या आनंद मेळाव्याला शरद पवारहाईस्कूल जुनिअर कॉलेज चे सर्व शिक्षकानी विध्यार्थीचे मनोबल वाडवले. त्यात श्री, जमील सर, समीर सर, वहाब सर, नदीम सर व इतर शिक्षकांचे समावेश आहे.

# केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे तहसीलदार किशोर यादव यांचे हस्ते उद्घाटन





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

वानोळा येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणामध्ये केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन माहूर चे तहसीलदार किशोर यादव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माहूरचे गटशिक्षण अधिकारी कृष्णा भराडिया, सरपंच सुनीता सिडाम, उपसरपंच अभिजीत राठोड, सदस्य सुदाम चव्हाण, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी राठोड, उपाध्यक्षा किरण सावन राठोड, माजी प्राचार्य जाधव, गोविंद चव्हाण, सुभाष राठोड,आत्राम ,पत्रकार पंडित धुप्पे, मुख्याध्यापक पोतुलवार, राजेंद्र चारोडे ,राजकुमार राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माहूरचे तहसीलदार किशोर यादव व मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वल करून उद्घाटन करण्यात आले. प्रस्ताविक राजेंद्र चारोडे यांनी केले.

विद्यार्थ्यांनी खेळातून आपल्या अंगी असलेले कलागुणांना वाव देऊन शारीरिक व बौद्धिक विकास करावा असे मार्गदर्शन करताना तहसीलदार किशोर यादव यांनी आपले विचार व्यक्त केले. या महोत्सवाला वानोळा, वानोळा तांडा, पानोळा ,मुंगशी ,मेंडकी, रामपूर ,मांडवा, वझरा, पाचुंदा, दहेगाव शाळेचे विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभाग नोंदविला होता. यावेळी शिक्षक केंद्रे, राठोड, संतोष चव्हाण, सोनकांबळे, दुधमल, कोतुलवार, नितीन जाधव, अक्षय राठोड, हर्षल राठोड, विश्वनाथ पवार यासह विविध शाळेचे शिक्षक व शालेय शिक्षण समितीचे सदस्य यांनी परिश्रम घेतले आहे. खेळीमेळीच्या वातावरणात चिमुकल्या मुलांनी आपले अंगी असलेले विविध गुण यावेळी विविध खेळाच्या माध्यमातून प्रेक्षकांना दाखविले यावर उपस्थित गावकरी मंडळी यांनी आनंद व्यक्त केला.

# उस्माननगर पोलीस ठाणे पोलीस दीदी उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद हद्दीतील २८ गावांत सपोनि चंद्रकांत पवार यांनी राबवला हा उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थी–विद्यार्थिनींना होणारा त्रास तसेच त्यांना माहिती पडणाऱ्या कुठल्याही प्रकारच्या गुन्ह्यांबाबत आता पोलीस दीदी उपक्रमाच्या माध्यमातून याकडे विशेष लक्ष देणार आहेत. पोलिसांविषयी असलेली भीती दूर व्हावी व शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी निर्भय राहावे, यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशानुसार कंधार उपविभागीय अधिकारी डॉ.अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली उस्मान नगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार यांनी ठाण्यांतर्गत २८ गावांना भेटी देऊन हा उपक्रम विद्यार्थ्यांना सांगितला त्यामुळे या उपक्रमाला सर्वत्र प्रतिसाद मिळाला .पोलीस दलातर्फे सुरू करण्यात आलेल्या नवीन उपक्रमासाठी पथक नेमण्यात आले आहे. पथकद्वारे विविध शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना माहिती दिली जात आहे. शालेय विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा वापर टाळावा तसेच ब्ल्युव्हेल, लुडो, तीनपत्ती पबजी खेळांपासून दूर राहावे, तसेच घरबसल्या ऑनलाईन तक्रार कशी करावी, यासह पोलीस प्रशासनातील कामकाजासंदर्भात माहिती सपोनि चंद्रकांत पवार यांनी दिली. यासाठी विद्यार्थ्यांना पोलीस , दीदी यांनी परस्पर संवादी जागरूकता कार्यक्रमात वाहतूक आणि रस्ते सुरक्षा, सायबर गुन्हे, माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ अल्पवयींनावर होणारे लेंगिक गुन्हे, रॅगिंग, ड्रग्ज, इतर विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग यांच्या नियमित संपर्कात राहावे, शाळा भेट रजिस्टर ठेवावे व




त्याच्या नोंदी रजिस्टरमध्ये घ्याव्यात त्याचबरोबर शाळेच्या सर्व सांस्कृतिक कार्यक्रम व इतर महत्त्वाच्या कामात सहभागी होऊन त्यांना पोलिसांची कामे व कर्तव्याबाबत शिक्षकांना व विद्यार्थ्यांना सूचित करावे, विविध वयोगटातील विद्यार्थांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श याविषयी जागरूकता निर्माण करावी लागणार आहे. पोलीस दीदीवर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी देखरेख करणार आहेत.कुठल्याही क्षणी दूरध्वनीवरून संपर्क केल्यास पोलीस ताबडतोब मदतीला धावून येतील. त्यामुळे निर्भयपणे परिसरात घडणाऱ्या गुन्ह्याच्या घटनांची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन सपोनि चंद्रकांत पवार यांनी केले. पोलीस विभागांतर्गत हद्दीतील कॉलेज व शाळांच्या भेटी घेऊन विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या उपक्रमातंर्गत विद्यार्थी केंद्रबिंदू असणार आहे. दरम्यान शाळा, महाविद्यालय परिसरात पोलीस गस्त वाढविण्यात येईल. शिक्षकांची भेट घेऊन विद्यार्थ्यांचे प्रश्न, समस्यांवर पोलीस लक्ष ठेवणार आहे. शाळांमध्ये रजिस्टरमध्ये असलेल्या नोंदीची दखल घेण्यात येणार . यात कर्तव्यात कसूर होता कामा नये, याची दखल घेण्यात येणार आहे द्यावी लागणार आहे, विशेष.अनुचित घटनेबद्दल तत्काळ माहितीशालेय परिसरात किंवा इतरत्र अनुचित प्रकार घडत असेल किंवा विद्यार्थिनींची कोणी छेड काढत असेल तर निर्भयपणे या घटनेबाबत पोलिसांना माहिती द्यावी, असे यावेळी बोलताना म्हणाले. प्रत्येक शाळेत देऊन जागरूकता निर्माण करण्याचं काम या ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार पोलीस उपनिरीक्षक गजानन गाडेकर पोलीस उपनिरीक्षक सूर्यवंशी पोलीस कर्मचारी जमादार सुशील कुबडे, श्रीमंगले, हंबर्डे, माधव पवार, आप्पाराव वरपडे, पूजा भटकुळे, आदींनी मार्गदर्शन केले या उपक्रमाची सर्वत्र चर्चा होत असताना दिसून येत आहे.

## उमरी येथील उड्डाणपुल, टपाल कार्यालयांच्याचे अतिक्रमण हटवून

# इमारतीच्या कामाचे नवनिर्वाचीत खा.प्रा रविंद्र चव्हाण यांनी मंजुरी आणावी उमरीकराची मागणी

## उमरी-गोरठा व उमरी-भोकर रोडवरील रेल्वे गेटवर रेल्वेचे उड्डाण नसल्याने दर तासाला उमरीकराना होते त्रास वाहनधारकांची गैरसोय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी | महेश पडोळे**

मतदार संघातील लोकसभेला प्रा.रविद्र चव्हाण खासदार झाले तर विधानसभेला दुसऱ्यांदा राजेश पवार आमदार झाले या दोन्ही भूमिपूत्रानी उमरी तालुक्यांचे प्रतिनिधीत्व करतांना शहरातील उड्डाणपूल व टपाल कार्यालयांची इमारत दोन प्रश्न तात्काळ तातडीने मार्गी लावा असे संबंध उमरीकराकडून मागणी केली आहे.यातउमरी-गोरठा व उमरी-भोकर रेल्वेगेटवर उड्डाण पुल नसल्याने वाहनांना व पादचाऱी प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.रेल्वेच्या वेळ पत्रकानुसार दर तासाला रेल्वे धावत असल्याने उमरी- गोरठा, उमरी-भोकर गेटवर रेल्वेगेट बंद झाले की अर्धातास गेट उघडण्याची वाट पाहावी लागते. त्यामुळे रेल्वे गेटवर वाहनांची एक कि.मी. लांबच्या लांब रांगांच्या रांगा लागत आहेत. रेल्वे गेट ऊघडले की गेटवर वाहनांची मोठी गर्दी होऊन वाहतूक विस्कळीत होत आहे.

तसे उमरी शहरातून रेल्वे जातांना शहरांचा अर्धा भाग उत्तरेकडे रहिवासी संख्या दहा ते पंधरा हजारांच्या वर वाढली त्यात शाळा,कॉलेज, महाविद्यालय, शासकीय व निमशासकीय कार्यालये आहेत तर अर्धा भाग दक्षिणेकडे व्यापार पेठ बाजार भरतो या सर्वांना रेल्वे स्थानकावरूनच येणाऱ्या व जाणाऱ्या संख्या जास्तीची असल्याने याही ठिकाणी उड्डाणपूलाची आवश्यकता आहे.तसेच टपाल कार्यालयांच्या जागेवर अनेकांनी अतिक्रमण केले.ते अतिक्रमण हटवून या ठिकाणी या टपाल कार्यालयांची इमारत उभी करावी अशी शहर वाशियाची मागणी आहे.

तसे पहाता मागील अनेक वेळा झालेल्या नांदेड लोकसभा निवडणुकीत उमरी तालुक्यातील मतदारांनी जुन्या खासदारांना मोठ्या मताधिक्याने निवडून दिले.त्या खासदारांनी उमरीकराच्या या रेल्वे उड्डाणपूल प्रश्न आजपर्यंत कोणीच सोडविला नाही तसेच एक्सप्रेस सुपरफास्ट गाड्यांना थांबा देऊ शकले नाही परंतु परवा लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील तरूण अभ्यासू खासदार प्रा.रविद्रं चव्हाण हे लोकसभेच्या निवडणुकीत निवडून गेले तर विधानसभेला भाजप



पक्षाकडून आ.राजेश पवार हे दुसऱ्यांदा निवडून आमदार झाले हे दोन्ही भुमिपूत्र मतदार संघातील असल्या कारणाने उमरी तालुक्यातील मतदारांनी मताधिक्याने निवडून दिले त्यांची परतफेड म्हणून तसेच रेल्वे उड्डाणपूल यांच्या हस्ते मंजुरी मिळाली तर या कामांची पिढ्यानपिढ्या आठवण जनतेला ही राहून जाईल यासाठी रेल्वेचे उड्डाणपूल, व शहरातील टपाल कार्यालयांच्या जागेवरिल अतिक्रमण हटवून या ठिकाणी इमारत उभी करावी अशी शहर वाशियाची मागणी आहे.,

रेल्वेस्थानकाच्या उत्तरेकडील भागात मोठी वस्ती वाढ झाली त्यांना रहदारीचा रस्ता उमरी रेल्वेस्थानकावरूनच येजा करावे लागते त्यासाठी उत्तरेकडुन दक्षिणेकडे जाणाऱ्या भागाकडे रस्ता प्रवाशांसाठी बंद करण्यात आल्याने परिसरातील रहिवासी नागरिकांना व शाळेतील विद्यार्थ्यांना, ये जा करण्यासाठी मोठी गैरसोय होत आहे.त्यासाठी रेल्वे स्थानकावर प्रवाशांना उड्डाणपूल बांधण्यात यावे अशी व्यंकटेश नगर, इस्लामपूरानगर, आंबेडकर नगर, गणेश नगर येथील रहिवासी वाशिया कडुन मागणी होत आहे. त्रस्त झालेल्या उमरी येथील नागरिकांकडून रेल्वे गेटवरील उड्डाणपुलाची समस्या केव्हा सुटणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला उमरी रेल्वे गेटवरील उड्डाणपुलाचा प्रश्न आजही रखडलेला असून या संदर्भात अनेकवेळा मागणी करुन सुध्दा आज पर्यंत कोणत्याही लोकप्रतिनिधींची या प्रश्नाबाबत उदासिनता दिसून येत होती. रेल्वे प्रशासनाने गोरठा जामगांव रोडवरील रेल्वे गेटवर अडर ब्रीज बनविल्याने अंडर ब्रीजमध्ये तसे पावसाळयात पाणी भर भरून रस्ता बंद होतो. वाहनधारकांसाठी अंडर ब्रीजचेही मोठी डोके दुखी ठरली आहे. तसेच उमरी-गोरठा व उमरी-भोकर हे दोन रेल्वे गेट दिवसांतून बत्तीस वेळा बंद होतात. बंद गेटचा फटका शहरातील नागरिकांसह वाहनधारकांना बसत असून खरे तर उड्डाणं पुल हे शहरातील रेल्वे गेटवर होणे गरजेचे आहे. वेळोवेळी या संदर्भात मागणी करुन सुध्दा या दोन्ही भुमि पुत्रानी या मागणीकडे दुर्लक्ष न करता तात्काळ लोकसभेचे खासदार प्रा् रविंद्रं चव्हाण , व आमदार राजेश पवार या दोन्ही लोकप्रतिनिधीनी रेल्वे उड्डाणपूलाचा प्रश्न निकाली काढावा अशी संबंध उमरीकराकडून मागणी होत आहे..फोटो..उमरी रेल्वे फाटक दर अर्धा तासाला बंद चालू त्यामुळे वाहनचालकांना होतोय त्रास, उड्डाणपूलाचा प्रश्न निकाली काढावा अशी उमरी शहरासह ग्रामीण भागातील जनतेची मागणी आहे.

# समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही-गुणवंत काळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

मातंग समाजाने शिक्षणाकडे फोकस केला पाहिजे तरच आपला समाजाचा विकास होणार आहे शिक्षणाशिवाय तरुणोपायच नाही असे मार्गदर्शन लसाकमचे महासचिव गुणवंत काळे यांनी हडको येथील कार्यक्रमात व्यक्त केले आहे.क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्यान महासंघ जिल्हा शाखा नांदेड व अण्णाभाऊ साठे स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१२ जानेवारी रोजी

मुक्ता साळवे, जयंती .जिजाऊ जयंती , सावित्रीबाई फुले,फातिमाबी शेख जयंती, स्वामी विवेकानंद यांची जयंती व लसाकम २०२५च्या दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमाचे अध्यक्ष लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब होते तर उदघाटक म्हणून लसाकम राज्याचे महासचिव गुणवंत काळे होते . लसाकम महासचिव गुणवंत काळे यांचे हस्ते लसाकम दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले, यावेळी लसाकमचे मार्गदर्शक शिवा कांबळे , लसाकम राज्यप्रवक्ता चंद्रकांत मेकाले , . डॉ गणपत वाडेकर ,युवा उद्योजक मा .माधवराव डोंपले डॉ. एन . के



वाघमारे , एम. एम. बसवंते, आर.जे. वाघमारे द्रोणाचार्य सर, बा .रा . वाघमारे,मेजर हरिषचंद्र गोपले, श्रीरंग , आनंदा वाघमारे, पपू गायकवाड, अंबादास मेकाले, आकाश टोमके, चंद्रकांत भांडवले, मारोती चिवळीकर,बाऱ्हाळी कर इतर मान्यवर उपस्थित होते . अध्यक्षीय भाषणामध्ये लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी क्रांतिकारक विचाराच्या वाघिणी मा जिजाऊ, माता मुक्ता साळवे फातिमाबी शेख व स्वामी विवेकानंद यांनी जे समाजासाठी कार्य केले ते आपल्यासाठी खूप लाख मोलाचे असून त्यांचा आदर्श समाजाने घेतला पाहिजे असे सांगून लसाकम विविध उपक्रम राबवित आहे . महापुरुषांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या विचाराचा वारसा आपण जोपासला पाहिजे व समाजामध्ये विकास आणि परिवर्तनाची क्रांती झाली पाहिजे असे लाख मोलाचे मार्गदर्शन विजय रणखांब यांनी केले. डॉ . नामदेवराव वाघमारे यांनी हडको येथे समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी अण्णाभाऊ साठे अभ्यास केंद्राची निर्मिती करण्यात आली आपण सर्वांनी जे विद्यार्थी अभ्यास केंद्रापासून दूर आहे त्यांना अभ्यास केंद्रामध्ये पाठविण्याची व अभ्यास केंद्रामध्ये विनामूल्य सुविधा असल्याने त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घेऊन समाजात उच्च पदस्थ अधिकारी घडले पाहिजे. असे आवाहन डॉक्टर वाघमारे यांनी केले आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ नामदेवराव वाघमारे यांनी केले प्रास्ताविक डॉ .वाडेकर यांनी केले , आभार प्रदर्शन सूर्यवंशी पी .एम . यांनी केले .

## मनोज जरांगे,आ.सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे, आ.प्रकाश सोळंके,आ.संदिप क्षीरसागर यांची बदनामी केल्याने त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेकाने चोख प्रत्युत्तर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करणारे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील,अन्याया विरुद्ध वेळोवेळी आवाज उठवणारे आ.सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेवर जोडे मारो आंदोलन करून या नेत्यांची बदनामी केली असल्याने पुणे,बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणी या नेत्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून प्रत्युत्तर देण्यात आले आहे याबाबत अधिक माहिती अशी की,

काल परळी शहरात चौकशीअंती वाल्मिक कराड याला मकोका या कायद्यान्वये विशेष चौकशी समितीने ताब्यात घेतल्यामुळे वाल्मीक कराड समर्थकांकडून बीड जिल्ह्यात संचारबंदी कायदा १४४ लागू असतानाही आरोपींच्या बाजूने चुकीच्या पध्दतीने समर्थन करून आरोपीना शिक्षा व्हावी ही सतत मागणी करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेला काळे फासून निषेध व्यक्त करत जोडे मारो आंदोलन केले आणि या निंद्य प्रकाराचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून या सर्व नेत्यांची बदनामी केल्यामुळे स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणी



अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सर्व सर्वसामान्य लोकांच्या भावना दुखावल्या आहेत...
काल परळी मध्ये जो निंदनीय प्रकार आरोपीच्या समर्थनार्थ घडला असून सर्व दोषींवर योग्य ती काय कायदेशीर कठोर कारवाई करावी यापुढेही असा प्रकार होणार नाही.या मागणीसाठी आष्टी मतदार संघातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येत निषेध व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी संघर्षयोद्धा मनोज जरांगे, आ.सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या अशा घोषणाबाजी करत अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या नेत्यांना समर्थन दिल्याचे पाहायला मिळाले. यावेळी आष्टी पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक श्री शरद भुतेकर यांना आणि आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाळकृष्ण पाटील हणपुडे यांच्याकडे मनोज रंगे पाटील आमदार सुरेश धस खासदार बजरंग सोनवणे आमदार प्रकाश सोळंके आणि आमदार संदीप क्षीरसागर यांची बदनामी करणाऱ्या या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी या मागणीचे स्वाक्षऱ्या केलेले निवेदन दिले.

## ओम सेवाभावी संस्थेच्या वतीने राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती निमित्त ॲड.दिलीप ठाकूर यांना नंदीग्राम एक्सलन्स जीवन गौरव पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**

ओम सेवाभावी संस्थेच्या वतीने राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवा दिनानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात करत असलेल्या सातत्यपूर्ण सेवेबद्दल धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांना नंदीग्राम एक्सलन्स जीवनगौरव पुरस्कार सन्मानित केले असून दिलीप ठाकूर यांच्या वतीने त्यांचे बंधू राजेशसिंह ठाकूर यांनी पुरस्कार स्वीकारला आहे.पुरस्कारांची संख्या ९३ झाल्यामुळे अनेकांनी अभिनंदन केले आहे.
नांदेड येथील श्री.भगवानराव नपाते मेमोरियल प्रतिभा नाट्य मंदिरात झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी व्यासपिठावर प्रतिभा निकेतन हायस्कुलच्या मुख्याध्यापिका सौ.अनघा कुरुंभट्टे, ओम सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष धनंजय जाधव व सचिव परसरामजी पतंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. दिलीप ठाकूर हे भाजपाच्या अधिवेशनासाठी शिर्डी येथे गेलेले असल्यामुळे त्यांच्या वतीने राजेशसिंह यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, मानपत्र, महावस्त्र व ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी यांनी प्रास्ताविक करतांना प्रदीप कदम यांनी असे सांगितले की, वर्षभरात ९० उपक्रम राबविणारे दिलीप ठाकूर हे आगळे वेगळे व्यक्तिमत्त्व आहे.समाजातील गोरगरीब, अनाथ, वेडसर, लोकांसाठी भाऊंचा डबा, चरणसेवा, मायेची उब, कायापालट, सेवा ही संघटन, भाऊचा माणुसकीचा फ्रिज, कृपाछत्र, उन्हाळ्यात पानपोई, रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहीम आदी सामाजिक उपक्रमासह इतर समाज उपयोगी उपक्रम जसे की नरेंद्र देवेंद्र महोत्सव, बहना भाग मत जाना, अमरनाथ यात्रा, गोदावरी गंगापूजन, मोठ्या पडद्यावर क्रिकेट स्पर्धा दाखवणे, राष्ट्रभक्तीपर




चित्रपट मोफत दाखवणे, आदी उपक्रम दिलीप ठाकुर हे राबवित आहेत. त्यामुळे त्यांना पुरस्कार देऊन पुरस्काराची उंची वाढली आहे.वर्षभरातील जगावेगळे ९० उपक्रम राबविणार्या दिलीप ठाकूर यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आतापर्यंत महाराष्ट्र रत्न, मराठवाडा भूषण, कर्मयोगी, दीनबंधू सेवा पुरस्कार, नांदेड के सांता, शान ए नांदेड, इन्स्पायर पर्सनालीटी, आदर्श शिवसैनिक पुरस्कार, राजपूत भूषण पुरस्कार, माँ जिजाऊ रत्न पुरस्कार, समाज विभूषण पुरस्कार, राजे छत्रपती शिवाजी सेवाभाई पुरस्कार, मातोश्री गंगूताई पुरस्कार, जीवन साधना पुरस्कार, भगत नामदेव लाईफ टाईम अचिव्हमेंट अवार्ड, अन्नपूर्णा प्रेरणा रत्न पुरस्कार, कानडा राजा पंढरीचा राष्ट्रीय कृपा पुरस्कार, तिरंगा गौरव पुरस्कार, लॉयन्स बेस्ट प्रोजेक्ट इंटरनॅशनल अवार्ड, कृतज्ञता सेवेचा पुरस्कार, राजरत्न पुरस्कार, संवेदनशील सामाजिक कार्यकर्ता,मराठी अपडेट कृतज्ञता पुरस्कार, संत नामदेव अखंड सेवा वृत्ती पुरस्कार,फिनिक्स ह्युमॅनिटी नॅशनल अवॉर्ड, आज का कर्मवीर,इंटरनॅशनल इस्पारिंग एक्सलंट अवॉर्ड हे पुरस्कार मिळालेले आहेत. कोरोना लॉकडाउनच्या काळातील केलेल्या कामाची दखल घेऊन २२ संस्थांनी कोरोना योद्धा हा पुरस्कार देऊन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे यातील १६ संस्था मुंबई, पुणे तसेच महाराष्ट्र बाहेरच्या आहेत.वर्षभरातील ३६५ दिवस दररोज तीन उपक्रम राबवणाऱ्या दिलीप ठाकूर यांना मिळालेल्या पुरस्काराची संख्या ९३ झाल्यामुळे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904